# घोषणा

## ऑनलाईन अर्जप्रणाली - प्रोफाईलमध्ये उमेदवारांनी करावयाच्या सुधारणा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत विविध पदांसाठी घेण्यात येणा-या परीक्षांकरीता उमेदवारांकडून विहित नमुन्यात ऑनलाईन प्रणालीद्वारे अर्ज स्वीकारले जातात. सदर ऑनलाईन अर्जप्रणालीमध्ये काही अतिरिक्त महत्वाची माहिती उमेदवारांकडून प्राप्त करुन घेणेची बाब आयोगाच्या विचाराधीन होती. यासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या ऑनलाईन अर्जप्रणालीमध्ये आयोगामार्फत काही सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. (उदा. - आधार कार्ड माहिती, अधिवास / जात / पडताळणी प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक, शासनाच्या दिनांक १ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार खेळाडू आरक्षणाच्या अनुषंगिक बदल, वगैरे) सदर नवीन ऑनलाईन अर्जप्रणाली **दिनांक ३ मार्च, २०१७ पासून** कार्यान्वित करण्यात येत आहे. त्याकरिता सर्व उमेदवारांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या **प्रोफाईलमध्ये अतिरिक्त आवश्यक माहिती** भरुन प्रोफाईल अद्ययावत करण्याची कार्यवाही पूर्ण करावी.

२. आयोगाने स्पर्धा परीक्षांकरीता जाहिर केलेल्या वेळापत्रकानुसार, ज्या-ज्या पदांच्या जाहिराती नजीकच्या १-२ महिन्यांत अपेक्षित आहेत, त्या-त्या परीक्षांकरीता अर्हताप्राप्त व इच्छूक उमेदवारांनी त्यांचे प्रोफाईल अद्ययावत करण्याची कार्यवाही प्राथम्यक्रमाने करावी. एकाच वेळी सर्व उमेदवारांनी प्रोफाईल अद्ययावत करण्याची कार्यवाही सुरु केल्यास वेबसाईटवर पडणारा संभाव्य ताण विचारात घेता, अनावश्यक घाई करण्याची आवश्यकता नाही.

**३.** निवड प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यावर उमेदवारांची ओळख पटविण्यासाठी उमेदवारांच्या ऑनलाईन प्रोफाईलमध्ये त्यांनी त्यांचा आधार क्रमांक नमूद करणे बंधनकारक करण्याचा निर्णय यापूर्वीच आयोगाने घेतला आहे. त्या दृष्टीने ज्यांचेकडे आधार कार्ड नाही, त्यांनी ते लवकरात लवकर प्राप्त करुन घेण्याबाबत आयोगाने दिनांक २६/०४/२०१६ रोजी घोषणाही प्रसिध्द केली होती. त्याअनुषंगाने आता उमेदवारांना **आधार कार्ड संबंधित व काही अतिरिक्त महत्वाची माहिती** नमूद करण्याची सुविधा त्यांच्या ऑनलाईन प्रोफाईलमध्ये उपलब्ध करुन देण्यात येत आहे. आधार कार्ड / आधार क्रमांक नसणा-या उमेदवारांना आयोगाच्या मुंबई येथील मुख्य कार्यालयात समक्ष येऊन पर्यायी प्रक्रियेद्वारे (alternative procedure)ओळख निश्चित करुन घेणे बंधनकारक राहील. या पर्यायी योजनेची कार्यपध्दती व तपशील स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येईल. तथापि अद्यापही आधार क्रमांक / कार्ड नसलेल्या उमेदवारांनी ते त्वरित मिळविणे व त्याचा तपशील प्रोफाईलमध्ये नोंदविणे त्यांचे हिताचे आहे.

**४.** नवीन ऑनलाईन अर्जप्रणालीमधील प्रोफाईलमध्ये नव्याने माहिती भरताना / माहिती अद्ययावत / सुधारित करताना उमेदवारांना काही अडचणी आल्यास, त्यांनी ऑनलाईन अर्जप्रणालीच्या संकेतस्थळाच्या मुखपृष्ठावरील मे.महाऑनलाईन लि. च्या **Help-Line क्रमांक ०२२-६१३१६४०२** वर सोमवार ते शुक्रवार स. ९.०० ते रात्री ८.०० , शनिवार व रविवार स. ९:३० ते रात्री ६.३० या वेळेत **किंवा ईमेलवर** (mpsc.support@mahaonline.gov.in किंवा suvidha.mahaonline.gov.in ) संपर्क साधावा.

ठिकाण : मुंबई<br>दिनांक : ३/०३/२०१७

सचिव<br>महाराष्ट्र लोकसेवा आयोग